दै. लोकमत दि. 03.01.2020

**गुन्हे शाखेची कामगिरी : चेन चोरी प्रकरणातही दोघे ताब्यात**

# नांदेड शहरातील १८ घरफोडी प्रकरणात दोघांना अटक

लोकमत दि. 03.01.20

लोकमत न्यूज नेटवर्क

**अबब... नामनूरविरुद्ध तब्बल ३४ गुन्हे दाखल**

◆ या दोन सराईत गुन्हेगारांपैकी संजय नामनूर याच्याविरुद्ध तब्बल ३४ घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत. १८ गुन्ह्यांचा उलगडा पोलिसांनी केला आहे. या घरफोड्यातील मुद्देमाल जप्त करण्याची प्रक्रिया सुरु आहे. त्यांच्याकडून जवळपास 30 तोळे सोने आणि ५ दुचाकी हस्तगत करण्याची प्रक्रिया सुरु असल्याचेही पोलीस अधीक्षक मगर यांनी सांगितले.

**नांदेड :** शहरात गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेली घरफोडीची मालिका उघडकीस आणण्यास अखेर पोलिसांना यश आले असून या प्रकरणात दोघांना स्थानिक गुन्हा शाखेने अटक केली आहे. त्यांच्याकडून तब्बल ३० तोळे सोने आणि ५ दुचाकी हस्तगत करण्याची प्रक्रिया सुरु असल्याची माहिती पोलिस अधीक्षक विजयकुमार मगर यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.

शहरात गेल्या काही दिवसांत लुटमार व घरफोडीच्या घटना वाढल्या होत्या. या घटनांच्या तपासात स्थानिक गुन्हा शाखेचे पथके तयार करण्यात आली होती.

या पथकाने गुप्त माहितीनुसार सराईत गुन्हेगार संजय उर्फ समीर पंडित नामनूर (वय २८, रा.महबूबनगर, नांदेड) आणि सय्यद हनीफ उर्फ हनी सय्यद जाफर (वय २०, रा.महबुबनगर, नांदेड) या दोघांना ताब्यात घेतले. त्यांची विचारपूस केली असता या दोघांनी शहरात शिवविजय कॉलनी, संभाजीरोड, कॅनॉलरोड, चैतन्यनगर, वैशालीनगर तरोडा बु., मंत्रीनगर, दीपनगर, संकेतनगर,बेलानगर, स्वस्तिक नगर, सहयोगनगर, आनंद नगर अशा ठिकाणी मागील दोन वर्षामध्ये घरफोड्या केल्याची कबुली दिली. तसेच ज्ञानेश्वर नगर व आनंद नगर या ठिकाणाहून महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावल्याचे सांगितले. काबरानगर व इतर ठिकाणाहून या दोघांनी दोन बुलेट, एक एफझेड, एक अॅक्टीव्हा अशा पाच दुचाकी लंपास केल्याचे सांगितले. पोलिसांकडून घटनास्थळाची पडताळणी करण्यात आली आहे. या दोन आरोपीकडून १८ गुन्ह्यांचा उलगडा झाला असून त्यांच्याकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असल्याचे पोलिस अधीक्षक मगर यांनी सांगितले.

रस्त्यावर लुटमार करणारे आकाश बंडू गुंजावळे (वय २१, रा. गोपाळनगर, बायपासरोड नांदेड) आणि उत्सव महादू बलाड (वय १९, रा.माळटेकडी पुलाजवळ नांदेड) या दोघांना अटक करण्यात आली आहे.

या दोघांच्या चौकशीत मागील सहा महिन्यात त्यांनी नांदेड शहर तसेच परिसरातील आसना ते चैतन्यनगरकडे जाणारा बायपास रोड, माळटेकडी पुलाखाली, डीमार्ट रोड, निळा रोड, सोनखेड रोड, सिडको आदी भागात रस्त्याने जाणाऱ्या आठ लोकांना अडवून रॉडने मारहाण करुन तसेच खंजरचा धाक दाखवून त्यांच्याकडील पैसे, मोबाईल लुटल्याचे पुढे आले आहे.

या दोघांना विमानतळ ठाणे हद्दीतील गुन्ह्यामध्ये अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. या पत्रकार परिषदेला पोलीस अधीक्षक मगर यांच्यासह स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांचीही उपस्थिती होती.